# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरातील मोक्षधाम आणि मानकापूर येथे ५ द.ल.लि. सांडपाणी
**{सा.आ.अभि.विभाग}** प्रक्रिया केंद्र अस्तित्वात असून अनुक्रमे नाग नदी व पिवळी नदी मधील सांडपाण्यावर प्रायमरी आणि सेकंडरी स्तरावर प्रक्रिया करण्यात येते. या दोन्ही सांडपाणी प्रक्रिया केंद्रांचे बांधकाम सन २०१७ मध्ये पूर्ण करण्यात येवून देखभाल व दुरुस्तीचे काम निविदाद्वारे नियुक्त कंत्राटदारास देण्यात आले आहे. सदरहू दोन्ही प्रकल्पांचे प्रकल्प सल्लागार म्हणून मा. स्थायी समिती, ठराव क्र. २१५, दिनांक २३.१२.२०११ च्या मंजूरीन्वये मे. आर जगताप ॲन्ड असोसिएटस्, नागपूर यांना कार्यादेश क्र. NMC/PPC/ EE(PPC)/६३६/२०११, दिनांक २६.१२.२०११ द्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांचेद्वारे मोक्षधाम आणि मानकापूर येथे ५ द.ल.लि. सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे डिझाईन, ड्राईंग, निविदा, कंत्राटदार नियुक्ती व ५ वर्षांकरीता देखभाल व दुरुस्ती करीता सल्लागार म्हणून काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

१५ व्या केंद्रीय वित्त् आयोगाच्या शिफारशीनुसार Million Plus Cities अंतर्गत सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षांतील पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन साठीच्या अनुदानाचा हप्ता आहरीत करणेबाबत शासन निर्णय क्र. एफएफसी-२०२२/प्र.क्र.११५/नवि-४, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दिनांक २५ ऑक्टोंबर २०२२ अन्वये नागपूर महानगरपालिकेस मान्यता प्रदान करण्यात आलेली असून नागपूर महानगरपालिका, राज्यशासन आणि केंद्रशासन यांच्या दरम्यान दिनांक २८.०३.२०२२ ला Memorandum of Understanding (MOU) करण्यात आलेला आहे. १५ व्या वित्त् आयोगाअंतर्गत नागपूर महानगरपालिकेतर्फे ५ विविध प्रकल्पास मंजूरी प्राप्त असून त्यामध्ये अस्तित्वातील मोक्षधाम आणि मानकापूर ५ द.ल.लि. सांडपाणी प्रक्रिया केंद्राकरीता Tertiary Treatment करणे प्रस्तावित आहे. याकरीता सिवरेज नेटवर्क आणि प्रक्रिया करीता रु. ६७.०७ कोटींच्या निधीस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. हे अनुदान मनपाचा हिस्सा म्हणून वापरण्यास मान्यता आहे.

करीता, अस्तित्वातील मोक्षधाम आणि मानकापूर ५ द.ल.लि. सांडपाणी प्रक्रिया केंद्राकरीता Tertiary Treatment उपकरण व साहीत्य लावण्याकरीता आणि आवश्यक स्थापत्य, इलेक्ट्रिकल कामे करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. आर जगताप ॲन्ड असोसिएटस्, नागपूर यांना प्री-टेंडर व पोस्ट-टेंडर कामांकरीता शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि-१६, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ४ जून २०१८ नुसार ठरवून देण्यात आलेल्या कामाचे प्रगतीच्या टप्प्यानुसार प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात सल्लागार शुल्क २.० टक्के प्रमाणे एकूण रु. ६,६०,०००/- भुगतान करण्यास आणि कार्यादेश मुदतवाढ देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप: १. विस्तृत माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.
२. या कामाचा खर्च १५ व्या वित्त् आयोग अनुदान / पद क्र. A४ ३९ ०२३ ७१९ १९/ ७३४ (लघु मलनिःसारण केंद्र) अंतर्गत करण्यात येईल.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 432/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 26/06/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील मोक्षधाम आणि मानकापूर येथे ५ द.ल.लि. सांडपाणी प्रक्रिया केंद्र अस्तिवात असून अनुक्रमे नाग नदी व पिवळी नदी मधील सांडपाण्यावर प्रायमरी आणि सेकंडरी स्तरावर प्रक्रिया करण्यात येते. या दोन्ही सांडपाणी प्रक्रिया केंद्रांचे बांधकाम सन २०१७ मध्ये पूर्ण करण्यात येवून

देखभाल व दुरुस्तीचे काम निविदाद्वारे नियुक्त कंत्राटदारास देण्यात आले आहे. सदरहू दोन्ही प्रकल्पांचे प्रकल्प सल्लागार म्हणून मा. स्थायी समिती, ठराव क्र. २१५, दिनांक २३.१२.२०११ च्या मंजूरीन्वये मे. आर जगताप ॲन्ड असोसिएटस्, नागपूर यांना कार्यादेश क्र. NMC/PPC/ EE(PPC)/६३६/२०११, दिनांक २६.१२.२०११ द्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांचेद्वारे मोक्षधाम आणि मानकापूर येथे ५ द.ल.लि. सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे डिझाईन, ड्राईंग, निविदा, कंत्राटदार नियुक्ती व ५ वर्षांकरीता देखभाल व दुरुस्ती करीता सल्लागार म्हणून काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

१५ व्या केंद्रीय वित्त् आयोगाच्या शिफारशीनुसार Million Plus Cities अंतर्गत सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन साठीच्या अनुदानाचा हप्ता आहरीत करणेबाबत शासन निर्णय क्र. एफएफसी-२०२२/प्र.क्र.११५/नवि-४, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दिनांक २५ ऑक्टोंबर २०२२ अन्वये नागपूर महानगरपालिकेस मान्यता प्रदान करण्यात आलेली असून नागपूर महानगरपालिका, राज्यशासन आणि केंद्रशासन यांच्या दरम्यान दिनांक २८.०३.२०२२ ला Memorandum of Understanding (MOU) करण्यात आलेला आहे. १५ व्या वित्त् आयोगाअंतर्गत नागपूर महानगरपालिकेतर्फे ५ विविध प्रकल्पास मंजूरी प्राप्त असून त्यामध्ये अस्तित्वातील मोक्षधाम आणि मानकापूर ५ द.ल.लि. सांडपाणी प्रक्रिया केंद्राकरीता Tertiary Treatment करणे प्रस्तावित आहे. याकरीता सिवरेज नेटवर्क आणि प्रक्रिया करीता रु. ६७.०७ कोटींच्या निधीस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. हे अनुदान मनपाचा हिस्सा म्हणून वापरण्यास मान्यता आहे.

करीता, अस्तित्वातील मोक्षधाम आणि मानकापूर ५ द.ल.लि. सांडपाणी प्रक्रिया केंद्राकरीता Tertiary Treatment उपकरण व साहीत्य लावण्याकरीता आणि आवश्यक स्थापत्य, इलेक्ट्रिकल कामे करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. आर जगताप ॲन्ड असोसिएटस्, नागपूर यांना प्री-टेंडर व पोस्ट-टेंडर कामांकरीता शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि-१६, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ४ जून २०१८ नुसार ठरवून देण्यात आलेल्या कामाचे प्रगतीच्या टप्प्यानुसार प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात सल्लागार शुल्क २.० टक्के प्रमाणे एकूण रु. ६,६०,०००/- भुगतान करण्यास आणि कार्यादेश मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**